# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.01.2025** **वारःशनिवार**

---

1. स्वामित्व योजनेअंतर्गत 65 लाखापेक्षा अधिक मालमत्ता कार्डांचं दूरस्थ पद्धतीनं आज वितरण
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला 31 जानेवारीपासून सुरूवात
3. राष्ट्रीय पोलाद प्राधिकरणाच्या पुनरूज्जीवनासाठी 11 हजार 440 कोटी रुपयांचा निधी मंजूर
4. इस्रायल संरक्षण मंत्रिमंडळाकडून युद्धविरामाला मंजुरी
5. 19 वर्षांखालील महिलांच्या वीस षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेला आज मलेशियात सुरूवात आणि
6. खोखो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरूष आणि महिला संघाची उपांत्यफेरीत धडक

**पंतप्रधान स्वामित्व**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरस्थ पद्धतीनं स्वामित्व योजनेअंतर्गत 65 लाखपेक्षा अधिक मालमत्ता कार्डांचं वितरण होणार आहे. देशातल्या गावांचं सशक्तीकरण आणि सुशासनासाठी हे महत्त्वाचं पाऊल ठरणार आहे. दहा राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या 50 हजारापेक्षा अधिक गावांमध्ये ही कार्डे वितरीत करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातल्या मालमत्ताधारकांना नोंदणीचा अधिकार प्रदान करून आर्थिक बदलांना प्रोत्साहन देणं हा योजनेचा उद्देश आहे.

**पीएम दिगांतर**

देशाच्या संरक्षण क्षेत्र तसंच अवकाश मोहिमांना सहाय्य करण्याच्या उद्देशानं काम करणाऱ्या दिगंतर या स्कॉट अभियानातील स्टार्टअपच्या यशाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. अंतराळास्थितीविषयी जागरुकता वृद्धीच्या दिशेने भारतीय अंतराळ उद्योगाकडून मिळालेले हे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचं मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. दुसऱ्या एका संदेशामध्ये पंतप्रधानांनी पीएम इंटर्नशिप योजनेच्या उत्साहवर्धक परिणामांविषयी समाधान व्यक्त केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारल्यामुळे देश विश्वनेता म्हणून प्रस्थापित होत असल्याबद्दलही आनंद त्यांनी या संदेशात व्यक्त केला आहे.

**पियुष गोयल**

वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल आजपासून तीन दिवसांच्या ब्रुसेल्स दौऱ्यावर आहेत. या भेटीदरम्यान ते व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयोगाच्या आयुक्त मारोज सेफकोविक यांच्याबरोबर उच्च स्तरीय बैठक घेतील. दोन्ही नेत्यांमध्ये भारत-युरोपियन महासंघांदरम्यान मुक्त व्यापार करारासंदर्भात वाटाघाटी आणि इतर द्विपक्षीय व्यापार बाबींच्या अनुशंगानं चर्चा होण्याची अपेक्षा आहे. अशी माहिती वाणिज्य मंत्रालयानं दिली आहे.

**अर्थसंकल्प**

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 31 जानेवारीपासून सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे पहिला टप्पा 13 फेब्रुवारी पर्यंत तर दुसरा टप्पा 10 मार्च ते 4 एप्रिल पर्यंत सुरू राहाणार आहे.

**पोलाद**

राष्ट्रीय पोलाद प्राधिकरणाच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्रिय मंत्रीमंडळानं 11 हजार 440 कोटी रुपयांच्या निधीला मान्यता दिली आहे.  असं माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांशी बोलताना सांगितलं. आंध्रप्रदेश स्थित ही कंपनी पोलाद उत्पादनासाठी महत्वाची आहे. या निधीमुळे कंपनीत काम करणारे कर्मचारी आणि संबंधित सर्व आस्थापनांना दिलासा मिळणार असल्याचं वैष्णव यावेळी बोलताना म्हणाले.

**मुख्यमंत्री**

दावोसमध्ये येत्या 20 ते 24 जानेवारी या कालावधीत होणाऱ्या जागतिक आर्थिक मंच परिषदेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी होणार आहेत. महाराष्ट्रात आणखी परकीय गुंतवणूक आणण्याच्या उद्देशाने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या पूर्वी फडणवीस त्यांच्या पहिल्या कार्यकाळात 3 वेळा दावोसमध्ये झालेल्या आर्थिक परिषदेत सहभागी झाले होते. औद्योगिक विकासात राज्याला पाचव्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावरआणण्यात याचं महत्वाचं योगदान होतं. या भेटीदरम्यान अनेक जागतिक नेत्यांच्याही ते भेटी घेणार आहेत.

**अन्न उत्पादन**

ग्राहकांना परवडणाऱ्या दरांत अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकार अन्नधान्यांची उपलब्धता आणि बाजारातील किंमतीवर बारकाईनं लक्ष ठेवत असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे. यंदाच्या वर्षी तुरडाळीचं उत्पादन 35 लाख टनापेक्षा अधिक राहाण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत अडीच टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तर मूगडाळीच्या उत्पादनातही गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ होईल. तर खरीप कांद्यांचे उत्पादनही अधिक होण्याची अंदाज मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**RBI-वारस नोंदणी**

देशभरातील बँकांनी सर्व ग्राहकांच्या मुदत ठेवी आणि लॉकर्स खात्यासाठी वारस नोंदणी झाल्याची खात्री करावी. असे निर्देश रिझर्व बँकेनं काल दिले. बँकांमधील ठेवींसाठी दावेदार उपलब्ध नसल्याचं निदर्शनास आलं आहे. या पार्श्वभूमीवर ठेवीदाराच्या मृत्यूनंतर कुटुंबातील सदस्यांच्या दाव्यांचा जलद निपटारा करण्यासाठी आणि संबंधितांचा त्रास कमी करण्यासाठी नामांकन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. बँकेतील मंडळानं ग्राहक सेवा समितीच्या माध्यमातून नामांकन नोंदणीचा नियमित आढावा घेण्याच्या सुचना आरबीआयनं दिल्या आहेत. या वर्षी 31 मार्चपासून तिमाही आधारावर आरबीआयच्या दक्ष पोर्टलवर प्रगतीचा अहवाल सादर करावा लागणार. असंही काल जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

**अमेरिका-टिकटॉक**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं व्हिडिओ सामाईक करणाऱ्या टिकटॉक या मंचावर कालपासून राष्ट्रव्यापी निर्बंध घालण्याचा कायद्यावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. चीनची मालकी असलेला हा मंच अमेरिकेतल्या उद्योजकाला विकेपर्यंत हे निर्बंध सुरू राहातील. या ॲपच्या माध्यमातून दुष्प्रचार करणे आणि वापरकर्त्याच्या माहितीशी छेडछाड करण्यासाठी चीन याचा वापर करू शकते असं अमेरिकेच्या सभागृह सदस्यांनी न्यायालयात सांगितलं. या ॲपवर बंदी घालणाऱ्या भारतासह ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, कॅनडा, फ्रान्स आणि नेदरलँडस् सह अनेक देशांच्या रांगेत आता अमेरिकेचाही समावेश झाला आहे.

**इस्रायल-युद्धविराम**

इस्राईलच्या संरक्षणविषयक मंत्रिमंडळानं काल हमास बरोबर युद्धकैद्यांची सुटका आणि युद्धविरामाला मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाने सरकारला तशी शिफारस केली आहे. गाझाच्या इतिहासात सर्वात घातक संघर्षापैकी एक असलेला संघर्ष संपवण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल असेल. कतार, अमेरिका आणि इजिप्त यांनी वाटाघाटीतून झालेल्या या करारामुळे दोन्ही बाजूंकडे

मोठ्या प्रमाणात झालेल्या जिवीतहानीचा संघर्ष थांबेल. इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयानं काल दिलेल्या माहितीनुसार, संरक्षणविषयक मंत्रिमंडळानं सर्व राजकीय, सुरक्षा आणि मानवतावादी पैलूंचं मूल्यांकन केल्यानंतर ही शिफारस करण्यात आली आहे. प्रस्तावित करार रविवारपासून अंमलात येईल. या कराराला अंतिम मंजुरी देण्यासाठी आज इस्रायली मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे.

**<u>रशिया-सैन्यदल</u>**

रशियातील सैन्यदलांत काम करणाऱ्या 12 भारतीयांचा मृत्यू झाला असून 16 जण बेपत्ता असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी काल दिली. आतापर्यंत रशियन सैन्यदलासाठी काम करणारे 96 भारतीय मायदेशी परतले आहेत. असंही ते म्हणाले.

**<u>अमेरिका-जंगल</u>**

अमेरिकेत दक्षिण कॅलिफोर्नियात लॉस एंजेल्स भागात लागलेल्या भीषण आगीत किमान 27 लोक मारले गेले तर आठवडाभराहून अधिक काळ लागलेल्या आगीत 12 हजार 300 हून अधिक इमारती ध्वस्त झाल्या आहेत. पॅलिसेडस्च्या आगीत 23 हजार 713 एकर जमीन होरपळली आहे. कॅलिफोर्नियाच्या जंगल आणि अग्नि संरक्षण विभागानं दिलेल्या माहितीनुसार 22 टक्के भागातल्या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं आहे.

**<u>बॅंडमिंटन</u>**

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरूषांच्या दुहेरीच्या उपांत्यफेरीत आज भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकी रेड्डीच्या जोडीचा सामना मलेशियाच्या जोडीशी होणार आहे. दिल्लीत आज संध्याकाळी हा सामना होणार आहे. काल उपांत्यपूर्व फेरीत भारतीय जोडीनं दक्षिण कोरियाच्या जोडीला 21-10, 21-17 असं सरळ सेटमध्ये पराभूत केलं.

**<u>अंडर-19</u>**

आयसीसीच्या 19 वर्षांखाली महिलांच्या वीस षटकांच्या विश्वकरंडक स्पर्धेला आजपासून मलेशिया इथं सुरूवात होत आहे. यामध्ये 19 संघ सहभागी होत आहेत. या संघाची चार गटात विभागणी केली असून, भारताच्या गटात मलेशिया, श्रीलंका, वेस्टइंडिज असेल. भारताचा पहिला गटसाखळी सामना उद्या वेस्टइंडिजबरोबर होणार आहे. आज सहा साखळी सामने होणार आहेत.

**<u>खो-खो-विश्वचषक</u>**

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघानं उपांत्यफेरीत धडक मारली आहे. पुरुष संघानं श्रीलंका संघावर 100-40 अशी मात केली. रामजी कश्यप कालच्या सामन्याचा सर्वोत्तम खेळाडू ठरला तर व्ही सुब्रमणी उत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा मानकरी ठरला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील महिला संघानं बांग्लादेश संघावर 109-16 असा विजय मिळवला. कालच्या सामन्यासाठी अश्विनी शिंदे सर्वोत्तम खेळाडू आणि रितू राणी सेन उत्कृष्ट बचाव खेळाडू ठरली.

**<u>हवामान</u>**

पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि चंदिगडमध्ये धुक्याची चादर पसरली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हिमालयातील पश्चिम भाग, ओडिशा, मध्य प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यात पुढील 2 दिवस दाट धुकं पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.